पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित जपानी कलावस्तू प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ. राजन गवस, डॉ. मेघा पानसरे, स्नेहल शेट्ये, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी.

(छाया : पप्पू अत्तार)

# समधूर जपानी वाद्ये.. ओरिगामीने बनविलेल्या कागदी वस्तूंचे आकर्षण

## विद्यापीठात जपानी कलावस्तू प्रदर्शनास प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जपानी ध्वज, भाषा-चित्रलिपी, स्केचेस, ओरिगामी पद्धतीने बनवलेल्या कागदी कलावस्तू, प्रतीकात्मक सांस्कृतिक वस्तू, चित्रमय बालकथा पुस्तके, जपानी पंखे, कॅलीग्राफी, भित्तीपत्रे अशा विविध वस्तू जपानी कला प्रदर्शनात ठेवण्यात आल्या आहे. सुमधूर जपानी तंतुवाद्य संगीत व जपानी संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या चित्रफितीमुळे प्रदर्शन दालनातील वातावरण जपानी झाले आहे.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे वि.स. खांडेकर भाषाभवन प्रवेश दालनात जपानी कलावस्तू प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन मराठी विभागप्रमुख प्रा. राजन गवस यांच्या हस्ते झाले. कलावस्तू प्रदर्शन हा एक अभिनव उपक्रम असून प्रेक्षकांना जपानी भाषा व संस्कृतीचा परिचय करून देण्याचे ते एक उत्तम माध्यम आहे, असे मत प्रा. गवस यांनी व्यक्त केले.

यावेळी विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, स्नेहल शेट्ये, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित 'रंग लोककले'चे कार्यक्रमात नृत्याविष्कार सादर करताना नृत्यांगना.

# वन्समोअर अन् लावण्यांची बरसात

## शिवाजी विद्यापीठात 'रंग लोककलेचे' कार्यक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर, ता. १ :** ठसकेबाज लावण्यांवर दिलखेचक नृत्याविष्कार सादर करत नृत्यांगनांनी रसिकांची आज येथे मने जिंकली. बतावण्यांतून सादर झालेल्या विनोदांवर टाळ्यांची दाद मिळाली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित 'रंग लोककले'चे कार्यक्रमाचे. या वेळी तमाशा प्रशिक्षण शिबिरातील सहभागींना प्रमाणपत्रांचे वितरण झाले. वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात कार्यक्रम झाला.

मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. या प्रसंगी डॉ. नंदकुमार मोरे, ज्येष्ठ तमाशा कलावंत आतांबर शिरढोणकर उपस्थित होते. सुरूवातीला गण-गवळण सादर झाली आणि बतावणीने कार्यक्रमात रंगत येत गेली. अफलातून टायमिंग साधत सादर झालेल्या विनोदांवर टाळ्यांची बरसात झाली. सभागृहात शिट्याही वाजल्या. त्यानंतर स्टेजवर पायात चाळ, डोक्यात गजर माळलेल्या नृत्यांगनांच्या लावण्यात सादर होऊ लागल्या. तसतसा सभागृहात टाळ्या व शिट्यांचा आवाज अधिकच घुमत गेला. 'या वेशीजवळ,' 'येऊ कशी कशी मी नांदायला,' 'गाडी आणावी बुरख्याची', 'माडीवरती उभी राहूनी', 'सगळ्यात भारी कोल्हापूरला इथे रसिक एक नंबर' या लावण्यांवर एकापेक्षा एक सरस नृत्य सादर झाले. सुरेखा डावाळे, सरस्वती डावाळे, धनश्री गुंपकुपे, हिना पाटील, रोहिणी डावाळे, अक्षता डावाळे, मेनका पोवार, भक्ती जाधव, राणी कुमठेकर, मेघा लाखे, अनिता औंधकर, मीनाक्षी लाखे, पूनम पाटील यांनी लावण्यांचे सादरीकरण केले. त्यांच्या नृत्याला रसिकांनी दाद देत 'वन्स मोअर'ची मागणी केली. रत्नाकर कांबळे, समाधान कांबळे, अनिता कांबळे, कांचन कुलकुटकी, रोहिणी डावाळे यांनी बतावणी सादर केली. रत्नाकर व समाधान कांबळे यांनी फार्सचे सादरीकरण केले. सुरेश कांडगावकर यांनी ढोलकी, तर विलास कांबळे हार्मोनियमची साथ दिली. किरणकुमार सौंदडे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

### लेखनाला गती : डॉ. गवस

महाराष्ट्रात ७० फड असून, पोत्यावर बसून तमाशा पाहिला. तमाशातील कलावंतांचे जगणे जवळून पाहायला मिळाले. तमाशा पाहून लेखनाला गती मिळाली, असे डॉ. गवस यांनी सांगितले.

सकाळ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागातर्फे आयोजित प्रदर्शनात मांडलेल्या जपानी कलाकृतींसमवेत विद्यार्थिनी.**

# वैविध्यपूर्ण जपानी कलाकृतींनी वेधले विद्यार्थ्यांचे लक्ष

**कोल्हापूर :** वैविध्यपूर्ण जपानी कलाकृतींनी विद्यार्थ्यांचे आज लक्ष वेधले. शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातर्फे वि. स. खांडेकर भाषाभवनात प्रदर्शनाचे आयोजन केले होते. ओरिगामी पेपर आर्टच्या माध्यमातून फुले, वस्तू, मास्क, कंदील अशा कलाकृती प्रदर्शनात मांडल्या होत्या. सुमारे चाळीस विद्यार्थ्यांचा प्रदर्शनात सहभाग होता. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तयार केलेल्या कलाकृती वैशिष्ट्यपूर्ण होत्या. जपानी भाषेतील मजकूरही लिहिला होता. त्याचबरोबर जपानी भाषेतील सुमारे शंभर पुस्तके प्रदर्शनात ठेवली होती. विभागप्रमुख प्रा. डॉ. मेघा पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदर्शन झाले. स्नेहल शेट्ये यांनी संयोजन केले.

Kolhapur, Kolhapur-Today
02/03/2019 Page No. 2

सकाळ

# लहान स्वप्नं पाहणं गुन्हाच

## सुहैल शर्मा : यशाचा 'एव्हरेस्ट' सर करण्याची दिली सळसळती 'ऊर्जा'

संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा

**कोल्हापूर, ता. १ : "लहान स्वप्नं पाहणं म्हणजे एक गुन्हाच असतो. कायद्याच्या भाषेत त्यासाठी कुठलीच शिक्षा नाही; मात्र लहान स्वप्नं आणि 'कंफर्ट झोन'चे गुलाम झाल्यास कधीच यशस्वी होता येणार नाही. जितकी अवघड वाटतात तितकी मोठी स्वप्नं बघा आणि त्यासाठी झपाटून कामाला लागा..." असा मौलिक मंत्र आज सांगलीचे पोलिस अधीक्षक सुहैल शर्मा यांनी दिला. निमित्त होते, संजय घोडावत ग्रुप स्टार एअर प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' या संवादमालिकेचे. या मालिकेतील दुसरे पुष्प आज त्यांनी गुंफले.**

शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात कोल्हापूरकरांच्या उत्स्फूर्त गर्दीत ही मालिका रंगली असून

रविवार (ता. ३) पर्यंत त्यातून सळसळती ऊर्जा घेता येणार आहे. सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सहकार्याने सलग पाचव्या वर्षी या उपक्रमाचे आयोजन केले आहे.

श्री. शर्मा माउंट एव्हरेस्ट सर करणारे पहिले पोलिस अधिकारी. त्यातही ते केंद्रीय लोकसेवा परीक्षेतून प्रशासकीय सेवेत आले असले तरी त्यांचं शिक्षण इंजिनिअरिंगमधलं. पुण्यातील महिंद्रा कंपनीतही त्यांनी काही काळ नोकरी केलेली. या साऱ्या प्रवासातील विविध पदर त्यांच्याशी संवादातून उलगडत गेले. श्री. शर्मा म्हणाले, "जे अवघड

पान २ वर »





कोल्हापूर : सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त सहकार्याने आयोजित संजय घोडावत ग्रुप स्टार एअर प्रस्तुत 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' संवादमालिकेत शुक्रवारी संवाद साधताना सांगलीचे पोलिस अधीक्षक सुहैल शर्मा. दुसऱ्या छायाचित्रात रिक्षा व्यावसायिक आनंदराव चव्हाण यांना श्री. शर्मा यांनी स्टेजवर बोलावून घेऊन कृतज्ञता व्यक्त केली. शेजारी मिलिंद कुलकर्णी.



डॉ. रवींद्र कोल्हे

### डॉ. रवींद्र कोल्हे यांच्याशी आज संवाद

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे यांच्याशी शनिवारी (ता. २) संवाद रंगणार आहे. डॉ. कोल्हे यांनी मेळघाटातील आदिवासींमध्ये केलेले काम एखाद्या दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे. एकूणच त्यांच्याशी संवादातून आदिवासींचे प्रश्न आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबवलेल्या यशस्वी संकल्पना उलगडणार आहेत.

सकाळ

# लहान स्वप्नं पाहणं गुन्हाच

» पान I वरून

वाटते, तेच स्वप्न उराशी बाळगून ते साध्य करण्याचा ध्यास घेऊनच नोकरी सोडली. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी सुरू केली आणि यशाला गवसणी घातली. त्यानंतर अगदी ठरवून महाराष्ट्रात काम करण्याला पसंती दिली आणि आता त्याचा अभिमानही वाटतो.'' कोल्हापुरात २०१६ मध्ये अपर पोलिस अधीक्षक म्हणून रुजू झालो आणि कोल्हापूरचाच होऊन गेलो. इथली माणसं आणि एकूणच शहराने भरभरून प्रेम दिलं. निवृत्तीनंतर कदाचित कोल्हापुरातच स्थायिक होईन, असे सांगून त्यांनी कोल्हापूरविषयीची कृतज्ञता व्यक्त केली. बुलडाण्यातील 'एटीएम'मधून ३२ लाखांची चोरी, मराठी शिकताना घडलेल्या गमती, आंध्र प्रदेशाच्या हद्दीत गेल्यानंतरच्या रंजक गोष्टींसह पोलिस अधिकारी म्हणून काम करताना आलेले विविध अनुभवही त्यांनी शेअर केले. 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, तनिष्क शोरूमचे प्रसाद कामत, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर आदींच्या प्रमुख उपस्थितीत श्री. शर्मा यांचे स्वागत झाले. मिलिंद कुलकर्णी यांनी हा संवाद आणखी उंचीवर नेला.

**वडील, एव्हरेस्ट अन् चित्तथरारक प्रवास**

''माउंट एव्हरेस्ट सर करण्याचा संकल्प केल्यानंतर जिद्दीने तयारी सुरू केली. त्यासाठी वडिलांचं मोठं पाठबळ मिळालं. मात्र, दरम्यानच्या काळात त्यांचे निधन झाले; मग त्यांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी एव्हरेस्ट सर करायचेच, हा निर्धार आणखी पक्का झाला. प्रत्यक्ष मोहिमेवेळी भूकंपामुळे कोसळलेल्या बर्फात साथीदार मित्रांना जीव गमवावा लागला. दुःख जरूर मोठे होते; पण त्यातून सावरून जिद्दीने पुन्हा चढाई सुरू केली. तीनशे फूट खाली कोसळलो आणि पुन्हा तितकाच प्रवास करावा लागला. एव्हरेस्टवर पोचल्यानंतर तिरंगा फडकवलाच; पण वडिलांच्या फोटोवर एक क्लिक घेतला. कारण मी त्यांचे स्वप्न पूर्ण केले होते...'' हा सारा चित्तथरारक प्रवास श्री. शर्मा यांनी उलगडला. या साऱ्या प्रवासाची चित्रफितही यावेळी दाखवण्यात आली. साहजिकच साऱ्या लोककला केंद्राने उभे राहून त्यांच्या या जिद्दीला सलाम केला.

**रिक्षामामांना कडकडून मिठी**

श्री. शर्मा कोल्हापुरात रुजू झाल्यानंतर पहिल्याच दिवशी त्यांनी रिक्षा व्यावसायिक आनंदराव चव्हाण यांच्या रिक्षातून तब्बल चार तास प्रवास केला होता; मात्र त्यांनी पोलिस अधिकारी ही ओळख सांगितली नव्हती. चार तास फिरताना श्री. चव्हाण यांनी त्यांना शहरातील सर्व प्रमुख ठिकाणं दाखवली आणि त्यांची माहिती दिली होती. त्यानंतर चार वर्षांत दोघांची कधीच भेट झाली नाही. आजच्या संवादाला श्री. चव्हाण उपस्थित होते. संवादानंतरच्या प्रश्नोत्तराच्या सत्रात माईक हातात घेऊन ते उठले. त्यांना बोलताना श्री. शर्मा यांनी ओळखले आणि 'तुम्हीच ना मला कोल्हापूर फिरवणारे,' असे म्हणत स्टेजवर बोलावून घेऊन कडकडून मिठी मारली.

### श्री. शर्मा सांगतात...

- ध्येय ठरवून कामाला लागा; मात्र कितीही अडचणी आल्या तरी मागे वळू नका
- 'कंफर्ट झोन'चे गुलाम होणे बंद करा. त्याशिवाय जगणं समृद्ध होणार नाही
- पोलिस चांगलेच काम करतात आणि येत्या काळातही करत राहतील
- मनाला पटत नसेल तर स्पष्टपणे नाही म्हणायला शिका
- वारंवार अपयशी होणाराच अखेर जिंकत असतो
- 'जी साहेब', 'हो साहेब' ही लाचारी नकोच नको
- स्वतःचा संघर्ष स्वतःशीच असावा. त्यातून आपण घडत जातो

### प्रायोजक असे...

- टायटल स्पॉन्सर : संजय घोडावत ग्रुप स्टार एअर
- सहप्रायोजक : तनिष्क शोरूम, चाटे ग्रुप ऑफ एज्युकेशन, मार्व्हलस इंजिनिअर्स
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी
- ट्रॅव्हल पार्टनर : मोहन ऑटो इंडस्ट्रीज प्रा. लि.
- फर्निचर पार्टनर : लकी फर्निचर

# इतिहास लेखन राष्ट्रभावनेतून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'मोगल साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर ब्रिटीश साम्राज्य आले, असा समज होतो. कारण हा इतिहास वसाहतवादी दृष्टिकोनातून वसाहतवादी इतिहासकारांनी लिहिला आहे. तर भारतीयांनी तो राष्ट्रभावनेतून लिहिला. यामुळे स्थानिक इतिहास लेखन करताना मौखिक, प्रादेशिक आणि समकालीन साधने दुर्लक्षित राहिली,' असे प्रतिपादन पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील इतिहास संशोधक डॉ. आर. सी. दास यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत आयोजित डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते शुक्रवारी बोलत होते. 'मराठा इतिहास लेखन पद्धतीचे नवे आयाम' या विषयावर ते बोलत होते.

'मराठेशाहीचे साम्राज्य आणि राजकारण' यावर प्रकाशझोत टाकताना इतिहास संशोधक डॉ. दास यांनी विस्तृत मांडणी केली. मोगल साम्राज्य, ब्रिटिश साम्राज्यातील इतिहास लेखनाचे संदर्भ देऊन त्यांनी इतिहास लेखन पद्धतींची सविस्तर माहिती दिली. मराठ्यांनी १८ व्या शतकात महाराष्ट्राबाहेर गुजरात, ओडिशा, आदी प्रांतांमध्ये जो विस्तार केला त्यावर अभ्यास करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी मांडले. तसेच इतिहास लेखन व

**डॉ. आर. सी. दास यांचे प्रतिपादन**

पद्धतीवर विवेचन केले. अध्यक्षस्थानी डॉ. नंदा पारेकर होत्या. छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अवनीश पाटील यांच्यासह संशोधन विद्यार्थी, पदव्युत्तरचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

व्याख्यानमालेतील दुसऱ्या पुष्पामध्ये शनिवारी (ता.२) डॉ. सी. आर. दास हे 'ओडिशा प्रांतातील मराठा राजकारण : १७५१ ते १८०३' या विषयावर व्याख्यान

लोकमत

दास : विद्यापीठात पवार स्मृती व्याख्यानमालेस प्रारंभ

# मराठ्यांचा विस्तार अभ्यासण्याची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मराठ्यांनी १८ व्या शतकामध्ये महाराष्ट्राबाहेर गुजरात, ओडिशा, माळवा या प्रांतांमध्ये जो विस्तार केला, त्यावर अभ्यास करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. सी. आर. दास यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि इतिहास अधिविभाग यांच्यामार्फत आयोजित डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. इतिहास अधिविभागाच्या सभागृहातील या व्याख्यानात त्यांनी 'मराठेशाही साम्राज्य आणि राजकारण' या विषयावर प्रकाशझोत टाकला. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, तर डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते. डॉ. नीलांबरी जगताप यांनी स्वागत केले. प्रा. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. दरम्यान, डॉ. दास हे आज, शनिवारी दुपारी बारा वाजता 'ओडिशा प्रांतातील मराठा राजकारण : १७५१ ते १८०३' या विषयावर व्याख्यान देणार आहेत.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत डॉ. सी. आर. दास यांनी विचार मांडले.

समकालीन

## साधने दुर्लक्षित

डॉ. दास म्हणाले, मोगल साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर ब्रिटिश साम्राज्य आले असा समज होतो. कारण, हा इतिहास वसाहतवादी दृष्टिकोनातून वसाहतवादी इतिहासकारांनी लिहिला तर, भारतीयांनी तो राष्ट्रभावनेतून लिहिला. स्थानिक इतिहास लिखाण करताना मौखिक, प्रादेशिक, समकालीन साधने दुर्लक्षित राहिली.

पुढारी

# नेतृत्व विकास केंद्राच्या समन्वयकपदी डॉ. शिवाजी जाधव



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी ही नियुक्ती केली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याकडून डॉ. जाधव यांना यासंबंधीचे पत्र प्राप्त झाले आहे. डॉ. जाधव यांनी पत्रकारितेत १५ वर्षे बातमीदारीपासून ते सहयोगी संपादक पदापर्यंतच्या विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांनी पत्रकारितेतील पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली असून आतापर्यंत १२ पुस्तकांचे लेखन केले आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने केंद्राचे कामकाज चालणार आहे. डॉ. आर. व्ही. गुरव यांचे यासाठी मार्गदर्शन लाभले.